वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

## राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) १४ वी बैठक बुधवार, दि.०६/०८/२०२५ चे इतिवृत्त

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) ची १४ वी बैठक बुधवार, दि.०६/०८/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली वसुंधरा, पुणे येथे संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या समितीच्या सदस्य व अधिकाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित करण्यात आलेली आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत Watershed Plus Projects चे सादरीकरण करण्यात आलेले आहे. सादरीकरण करण्यात आलेल्या ४ Watershed Plus प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC)ची मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

सभेचे प्रास्ताविक सदस्य सचिव तथा अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. त्या वेळी त्यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

१. Watershed Plus Projects हा योजनेचा अत्यंत महत्वपुर्ण घटक असून गुणवत्तापुर्वक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेले असावेत.

२. सविस्तर प्रकल्प अहवालांचे सादर करताना विहीत प्रपत्रातील सर्व भाग सादर करण्यात यावेत.

३. प्रकल्पांतील निवडलेली गावे जल परिपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणलोट कामांचे नियोजन करण्यात यावे अशा सुचना अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.

४. सदस्य सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे परिपुर्ण सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात यावेत. अर्धवट तसेच त्रुटीयुक्त सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात येवू नये. त्रुटीयुक्त सविस्तर प्रकल्प अहवालांना बैठकीमध्ये शिफारस करण्यात येणार नाही.

राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) १४ वी बैठक बुधवार, दि.०६/०८/२०२५ रोजी सादर करण्यात आलेले Watershed Plus Projects चे सविस्तर प्रकल्प अहवाल

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) चे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | Nandurbar(WDC.2)/2/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा श्री. एस. सी. नामदास यांनी केले. |
| २ | परभणी | Parbhani(WDC.2)/3/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण उपविभागीय जलसंधारण अधिकारी श्री. दीपक अंचूले यांनी केले. |
| ३ | धाराशिव | Osmanabad (WDC.2)/2/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण NGO-प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा श्री. विकास लटपटे यांनी केले. |
| ४ | छ. संभाजीनगर | Aurangabad (WDC.2)/3/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण उप कृषी अधिकारी श्री. सपाटे ए. डी. यांनी केले. |

सदर चारही प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल पाहता सदर DPR हे केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या Guideline मधील मुद्दा क्र. ७ मधील b (बी) नुसार (Criteria for selection of WDC-Plus Watershed) नुसार तयार केल्याचे दिसून येत नाही. Watershed Plus Projects मध्ये सदर प्रकल्पांचे Line व Drainage Treatment अशी कामे प्रस्तावित होणे आवश्यक आहे, त्यामुळेच सदर प्रकल्पांचा "Watershed Concept" परिपूर्ण करेल.

परंतु वारंवार सूचना देऊनही सदरच्या चारही प्रकल्पांमध्ये DPR तयार करताना लक्ष दिले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरच्या जिल्ह्यांनी पुनश्च DPR तयार करताना केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या Guideline वरून Fesible DPR तयार करणे आवश्यक आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये चारही प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता प्रदान करता येणार नाही.

तसेच पुनश्च सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी (DWCO) आणि प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांना याबाबत सूचना देऊन ज्या प्रकल्पांचा मंजूर खर्च पूर्ण होत आलेला आहे त्याच प्रकल्पांचा केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या Guideline वरून Fesible DPR तयार करून पुढील येणाऱ्या SLTC बैठकीस सादर करण्याच्या सूचना देऊन बैठक संपल्याचे जाहीर केले.

(कमलाकर रणदिवे)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २,०.
महाराष्ट्र राज्य०१ - पुणे ,

(प्रकाश खपले)भा.से.प्र.
आयुक्त,मृद व जलसंधारण ,
महाराष्ट्र राज्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २,०.
महाराष्ट्र राज्य०१ - पुणे ,